**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर- १६२२/२०२२**

**अपिलार्थी, श्री.हरेश पुरुषोत्तम कलवानी,**
१२, देवसीविल्ला, कॉर्टर रोड नं. ३,
साई धाम बिल्डींग समोर, बोरवली पूर्व,
मुंबई ४०० ०६६.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा महसूल सहाय्यक,
उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचे कार्यालय,
पवई चौक, उल्हासनगर कॅप नं.३, जि.ठाणे ४२१ ००३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
उल्हासनगर,पवई चौक, उल्हासनगर कॅप नं.३,
जि.ठाणे ४२१ ००३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २५.०२.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०२.२०२२ | -- | १२.०४.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २६.०५.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती देण्यात आली नाही व सुनावणी घेण्यात आली नाही "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २५.०२.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.गणेश वळवी, महसुल सहाय्यक, उपविभागीय अधिकारी कार्यालय, उल्हासनगर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"

1) *सनद पडताळणी letter dt. 07.07.2012 in sub matter plot no.36 end verification of CD dt. 27.01.1992 adv. Notice dt. 23.09.2019.*
2) *सनद पडताळणी letter dt.29/11/2012 for Plot no.35 and verification ACD dt.07/11/1992 Advocate notice date 23/09/2019.*
3) *Letter dt.27/02/2023 for issue of POA admin Area 1320sq. yards in former of Kamal Chander Ochani and POA Admin Area 1320 sq. yards in former A.m/s.Tirupati Interprise and along with sketch plan each for Admin Area 1320sq.yards still not received. "*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. तसेच त्यांनी केलेल्या प्रथम अपिलामध्ये सुनावणी घेण्यात आलेली नाही किंवा कोणतेही आदेश पारित करण्यात आलेले नाहीत.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.गणेश वळवी, महसूल सहाय्यक, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, उल्हासनगर यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्लॉट क्र.३५ व ३६ या मिळकतीच्या सनद पडताळणीच्या मुळ संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत. त्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि.०२.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

श्री.गणेश वळवी यांच्या या खुलाश्यावरुन असे दिसून येते की, सदर संचिका या उपविभागीय अधिकारी कार्यालय, उल्हासनगर या कार्यालयात आढळून येत नाहीत. तथापि त्या का आढळून येत नाहीत यासंदर्भात श्री.गणेश वळवी काहीही सांगू

शकले नाहीत. तसेच यासंदर्भात अद्यापपर्यंत कोणतीही चौकशी अथवा सदर संचिका शोधण्यासंदर्भातील कोणतेही प्रयत्न उपविभागीय अधिकारी उल्हासनगर या कार्यालयाने केलेले नाहीत असेही श्री.गणेश वळवी यांनी सुनावणी दरम्यान सांगितले.

सनद पडताळणी संदर्भातील संचिका गहाळ होणे ही बाब अतिशय गंभीर आहे. उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालयाने सदर संचिका गहाळ झाली आहे याबाबत अपिलार्थी यांना काहीही कळविले नाही. तसेच आयोगास देखील त्याची कारणे निदर्शनास आणली नाहीत. त्यामुळे उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी प्लॉट क्र.३५ व ३६ बाबतची सनद पडताळणीची संचिका का गहाळ झालेली आहे व यासंदर्भात सदर संचिकेचा शोध घेण्यासाठी त्यांनी काय कार्यवाही केलेली आहे किंवा करणार आहेत? यासंदर्भातील शपथपत्र पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. श्री.विजयानंद शर्मा, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी प्लॉट क्र.३५ व ३६ बाबतची सनद पडताळणीची संचिका का गहाळ झालेली आहे व यासंदर्भात सदर संचिकेचा शोध घेण्यासाठी त्यांनी काय कार्यवाही केलेली आहे किंवा करणार आहेत? यासंदर्भातील शपथपत्र पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१८.०३.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
श्री.विजयानंद शर्मा,
उपविभागीय अधिकारी उल्हासनगर,
पवई चौक, उल्हासनगर कँप नं.३,
जि.ठाणे ४२१ ००३.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ